महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
कस्तुरी इमारत, तळ मजला,
पेट्रोलियम हाऊस समोर, ज.द.मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दूरध्वनी क्रमांक:०२२- २२८८०१०६/१७ ईमेल : ao.transfer2024@mahakosh.in संकेतस्थळ:www.mahakosh.gov.in

************************************************************************************************************

वाचा :-
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१
३. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.०१.२००२
४. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३,दि.३१.०८.२००९
५. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०
६. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१.०७.२०११
७. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३,दि.१९.०१.२०१३
८. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०९.१२.२०१६
९. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ दि.२३.१२.२०१५
१०. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३ दि.११.०५.२०१७
११. शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२.०३.२०१९
१२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९
१३. वित्त विभाग पत्र क्र.वेतन १११९/प्र.क्र.३/सेवा-३ दि.०२.११.२०२०
१४. वित्त विभाग शासन आदेश क्र.संलेको २०२३/प्र.क्र.१७५/कोषा प्रशा २ दि.१०.११.२०२३
१५. वित्त विभाग शासन शुद्धीपत्रक आदेश क्र.संलेको २०२३/प्र.क्र.१७५/कोषा प्रशा २ दि.११.१२.२०२३

---

क्र.संलेको २०२६/प्रशा-राप/सुसेआप्रयो/ 1045          दिनांक :- 05 AUG 2026

**विषय : तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करणेबाबत**

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी / अधिकाऱ्यांना १०,२० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील नमूद तरतुदीनुसार, सातव्या आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु.५४००/- या सुधारीतवेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी /अधिकाऱ्यांना लागु राहील. संबंधित कर्मचारी / अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

तथापि महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गातील जे अधिकारी सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० या वेतन स्तरामध्ये वेतन आहरित करतात, त्यांचे पुढील पदोन्नती साखळीतील पद उपसंचालक असून ते एस-२३ या वेतनस्तरामध्ये येते. याबाबत शासन वित्त विभागाने दि.०२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये "सहायक संचालक"

पदावरील अधिका-यास विद्यमान एस-२० या वेतनस्तरानंतर पदोन्नतीच्या साखळीत (In Promotional Hierarchy) एस-२३ या वेतनस्तरामध्ये उपसंचालक हे पद असल्याने, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्रता आजमावल्यानंतर, पात्र ठरत असल्यास, संबंधितास वेतनस्तर एस-२३ मध्ये अनुज्ञेय लाभ मंजूर करता येईल." अशी मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गातील श्रीम.सुनिता राजेंद्र केसकर या दि.१५.१२.२००४ रोजी लेखा अधिकारी संवर्गात सरळसेवेने नियुक्त झाल्या आहेत. तद्नंतर त्यांना दि.१०.१२.२०१५ रोजी सहायक संचालक संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. सदर पदोन्नती सन २०२१-२२ च्या निवडसूचीतून नियमित करण्यात आली आहे.

वित्त विभाग शासन निर्णय दि.०२.०३.२०१९ अन्वये सातव्या वेतन आयोगामध्ये १०,२० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे. श्रीम.केसकर दि.१५.१२.२००४ रोजी लेखा अधिकारी संवर्गात सरळसेवेने नियुक्त झाल्या असून त्यांना लेखा अधिकारी संवर्गात नियमित सेवेची १० वर्षे दि.१५.१२.२०१४ रोजी पूर्ण झाली असली तरी त्यांनी सहायक संचालक पदावरील पदोन्नतीसाठी पूर्वअर्हता असणारी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ परीक्षा खालील तक्त्यात स्तंभ क्र.५ मध्ये नमूद दिनांकास उतीर्ण केली आहे. त्यामुळे श्रीम.केसकर यांना उत्तीर्ण केलेल्या परीक्षेच्या शेवटच्या पेपरच्या (१४.०६.२०१९) दुस-या दिवसाच्या दिनांकास म्हणजेच दि.१५.०६.२०१९ पासून सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय ठरत आहे.

| अ क्र | अधिकाऱ्यांचे नांव | शासकीय सेवेतील नियुक्तीचा दिनांक | प्रथम पदोन्नती | विभागीय परीक्षा उत्तीर्ण (म.वि.व ले.से. वर्ग-१ परीक्षा) | तीन लाभांच्या सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम.सुनिता राजेंद्र केसकर | १५-१२-२००४ ले. अ. नियुक्ती | १०-१२-२०१५ सहायक संचालक (निवडसूची वर्ष २०२१-२२ मध्ये नियमित करण्यात आली आहे) | भाग-१ ऑक्टो २०१४ (परीक्षा दि.०२ ते ०५ जानेवारी,२०१८) भाग-२ एप्रिल २०१५ (परीक्षा दि.११ ते १४ जून,२०१९) | १५-०६-२०१९ सहायक संचालक संवर्गाची वरिष्ठ वेतनश्रेणी |

अटी व शर्ती :

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०८.०६.१९९५ मधील अट क्र.२ (मा) : या योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारी व कर्तव्यांमध्ये वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेंतर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित/ कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. या आदेशान्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक.पीएवाय-१०८२/सीआर/११००/(एक)/एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दि.२०.०२.२०१९ नुसार वेतननिश्चितीचा विकल्प द्यावयचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालय प्रमुखांकडे सादर करावा.

३. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतननिश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करून त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून एस-२० वेतनस्तरामध्ये देण्यांत यावा.

४. सदरचे आदेश संचालनालयाच्या https: mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरावी.

(दीपा देशपांडे)
संचालक
लेखा व कोषागरे.
महाराष्ट्र राज्य. मुंबई.

प्रत :.
१. सहसचिव,वित्त विभाग,मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०३२
२. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे
३. संबधित अधिकारी यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत
४. संबधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
५. निवड नस्ती.